# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ०२.०५.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) सक्करदरा पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या ०३ आरोपींना अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक ०२.०५.२०२६ चे ०२.०० वा. ते ०३.१० वा. चे दरम्यान, सक्करदरा पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे हद्दीत, मोठा ताजबाग, प्लॉट नं १३२, खादीम गल्ली, खिदमत गेस्ट हाऊस, रूम नंबर ०३ येथे पंचासमक्ष रेड कार्यवाही केली असता, तेथे आरोपी क्र. १) शेख आमीर शेख इब्राहिम, वय २१ वर्षे, ०२) मोहम्मद समिर मोहम्मद साबिर, वय १९ वर्षे, दोन्ही रा. बोराबंडा पंखा, पिली दर्गाह जवळ, असपतपेठ, ओल्ड बोविनपल्ली, तह. कुकटपल्ली, जि. हैदराबाद, राज्य तेलंगणा हे दोघे मिळुन आले. पंचासमक्ष रूमची झडती घेतली असता, त्यांचे ताब्यातील एका कत्थ्या रंगाचे बॅगेत एकुण ४ किलो ५२० ग्रॅम गांजा किंमती ७०,०००/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने तो जप्त करण्यात आला. आरोपींची सखोल विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद गांजा त्याचा साथिदार आरोपी क्र. ३) अब्दुल नईम शेख वल्द रहीम शेख, वय ३३ वर्षे, रा. लाल झेंडा चौक, यशोधरानगर, नागपुर याचे मदतीने आणल्याचे सांगीतले. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क), २०(ब), २(ब), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे सक्करदरा येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. शिवाजीराव राठोड अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती रश्मीता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री. प्रदीप शिरस्कर सहा. पोलीस आयुक्त (सक्करदरा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रमोद पोरे, पोउपनि. अजय कंवर, महेश पांडे, पोहवा. मनोज काळसर्पे व टप्पुलाल चुटे यांनी केली.

**२) गुन्हेशाखा युनिट क. २ पोलीसांची कामगीरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीस अटक**

पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, जगदीश नगर, हनुमान मंदीर जवळ, गिट्टीखदान, नागपूर येथे राहणारे फिर्यादी पवन श्रवणलाल बिटले, वय २९ वर्षे यांचे घराशेजारी हनुमान मंदीर असुन, ते तेथे देखभाल करतात. मंदीरात फिर्यादी यांनी पाहणी केली असता, हनुमानजीचे मुर्तीचे चांदीचे मुकुट व त्यावरील चांदीची छत्री त्यांना दिसुन आले नाही. फिर्यादी यांनी सिसिटीव्ही ची पाहणी केली असता, दिनांक २९.०४.२०२६ चे

१५.३० वा. चे सुमारास, कोणीतरी अज्ञात चोरट्याने प्रवेश करून, नमुद चांदीचे मुकुट व छत्री एकुण किंमती ४०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा, युनिट क्र. २ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून आरोपीस निष्पन्न केले. तसेच, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपी नामे श्रावण कृष्णाजी खाकरे, वय ६५ वर्षे, रा. राजापेठ, हुडकेश्वर, नागपुर ह.मु.— गजानन मंदीर जवळ, आर्वी रोड, पुलगांव, जि. वर्धा यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद मंदीर चोरीचा गुन्हा केल्याचे कबुल केले. आरोपीचा गुन्हे अभिलेख तपासला असता, तो रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन, तो घरफोडी व चोरीचे गुन्हे करणारा सराईत गुन्हेगार असल्याचे व त्याचे विरूध्द २९ वेगवेगळे गुन्हे दाखल असल्याचे निदर्शनास आले. आरोपीस अटक करून पुढील कार्यवाहीस्तव गिट्टीखदान पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. डॉ. संदीप पखाले, पोलीस उप आयुक्त (अती. कार्य. डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख, सपोनि. गजानन चांभारे व त्यांचे पथकाने केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे जरीपटका :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ३०.०४.२०२६ चे ०७.०० वा. ते दि. ०१.०५.२०२६ चे ११.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, प्लॉट क्र. ४३, राजनंदीनी ले—आऊट, गौतम नगर, समता नगर रोड, नागपुर येथे राहणारे फिर्यादी श्रीराम भुषण खोब्रागडे, वय ८० वर्षे हे आपले राहते घराला कुलूप लावून परिवारासह लग्न समारंभाकरीता गडचिरोली येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख ७०,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ३,२०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. दशरथ पवार ८३९०४१४५२० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. :— गंभीर अपघात करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०१.०५.२०२६ चे ०८.०० वा. चे सुमारास, फिर्यादी सुधाकर रामदास माडलीक, वय ५३ वर्षे, रा. प्लॉट नं. १९८, डायमंड कॉलोनी, दवलामेटी, वाडी, नागपुर हे त्यांचे डिलक्स दुचाकी क्र. एमएच ४० के. ७९६७ ने पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. हद्दीत, सेंट्रल एम.आय.डी.सी. रोड, एम.आय. हॉटेल समोरून जात असता, नेक्सॉन कार क्र. एम.एच. ४० डि.ई. ७६६७ चा चालक आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे दुचाकीस मागुन धडक देवून, गंभीर जखमी करून घटनास्थळावरून पळुन गेला. जखमी फिर्यादी यांना उपचाराकरीता लता मंगेशकर हॉस्पीटल येथे दाखल केलेले आहे. उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या बयानावरून पोउपनि. पंकज सयाम ९४०५५४५४२७ यांनी पोलीस ठाणे एमआयडीसी. येथे नेक्सॉन कार चालक आरोपीविरूध्द कलम २८१, १२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे नंदनवन :—** कु. उज्वला परमानंद गौतम, वय २५ वर्षे, रा. जयंत नगरी—७, फ्लॅट नं. ९०२, बेसा—पिपळा रोड, बेलतरोडी, नागपूर ही दिनांक २९.०४.२०२६ रोजी, पोलीस ठाणे नंदनवन हद्यीतुन कोणाला काहीही न सांगता, घरून कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता, मिळून आली नाही. **वर्णन—** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची— ५ फुट, केस— काळे लांब अंगात— टि—शर्ट व जिन्स पॅन्ट घातलेले आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते. ओळख— उजव्या भुवई जवळ तिळ आहे.

**२) पोलीस ठाणे नंदनवन :—** आनंद चंद्रशेखर जवजवार, वय ४८ वर्षे, रा. प्लॉट नं. ३८, गल्ली नं. ३, बापु नगर, नंदनवन, नागपूर हे दिनांक २९.०४.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे नंदनवन हद्यीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता, घरून कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आले नाही. **वर्णन—** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची— ५ फुट ४ इंच, केस— काळे, अंगात— कत्थ्या रंगाचा हाफ शर्ट व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते. ओळख— कपाळावर व मानेवर डागाचे निशान आहे.



उज्वला



आनंद

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**